# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः11.05.2024** **वारःशनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराचा आज अखेरचा दिवस
2. 2023-24 या आर्थिक वर्षात देशातल्या तेल विपणन कंपन्यांचा एकत्रित नफा 86 हजार कोटी रुपये, गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत 25 पटीनं अधिक
3. सायबर गुन्ह्यांमध्ये गैरवापर झालेल्या देशभरातील 28 हजार 200 मोबाईल हँडसेट ब्लॉक करण्याचे दूरसंचार विभागाचे सेवा कंपन्यांना निर्देश
4. डॉक्टर नरेंद्र दाभोळकर हत्येप्रकरणी सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना जन्मठेप; तर विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची पुराव्याअभावी सुटका आणि
5. देशाच्या मध्य, पूर्व आणि दक्षिण भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता.

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराचा आज अखेरचा दिवस आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांचे नेते, उमेदवार झंजावाती प्रचार करत मतदारांना आकर्षित करत आहेत. या चौथ्या टप्प्यात पुणे जिल्ह्यातील पुणे शहर, शिरूर आणि मावळसह औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, अहमदनगर आणि शिर्डी या 11 लोकसभा मतदारसंघांमध्ये, येत्या सोमवारी 13 मे रोजी मतदान होणार आहे.

पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल नंदुरबार इथं महायुतीच्या उमेदवार हिना गावित यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली. अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गाचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही, याचा पुनरुच्चार मोदी यांनी यावेळी केला. प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात अशा आशयाचं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी केलं होतं. त्या अनुषंगाने बोलताना, मोदी यांनी, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना महायुतीमध्ये सहभागी होण्याचं आमंत्रण दिलं.

दरम्यान, शरद पवार यांनी मात्र मोदी यांचा प्रस्ताव फेटाळला आहे. मोदी यांच्याविरोधात जनमत तयार होत असल्याने ते अस्वस्थ झाले असून संभ्रम निर्माण करणारी विधानं करत असल्याचं पवार म्हणाले. ते काल पुण्यात बातमीदारांशी बोलत होते. आमचा पक्ष गांधी-नेहरुंच्या विचारधारेवर चालतो. समाजातल्या सर्व घटकांना एकत्र ठेवून आम्ही काम करतो, त्यामुळं अशा प्रस्तावाला पाठिंबा देता येणार नाही, असं ते म्हणाले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही मोदी यांच्या या प्रस्तावावर टीका केली आहे. ते काल मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल पुण्यातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली. पुणे शहराचा बकालपणा मोठ्या प्रमाणात वाढतो आहे; योग्य नियोजन झालं नाही तर ही शहरं उद्ध्वस्त होतील. याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यायला हवं असं मत राज ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केलं. शहरांच्या प्रश्नांकडे लक्ष जाऊ नये, म्हणून काही नेते तुम्हाला जातीपातीत गुंतवून ठेवत आहेत. मात्र तुम्ही जातीपातीतून बाहेर पडा, असं आवाहन त्यांनी लोकप्रतिनिधींना केलं.

**<u>खरगे</u>**

देशात लोकसभा निवडणूकीच्या विविध टप्प्यातील मतदानाच्या टक्केवारीचे आकडे जाहीर करताना होणारा विलंब आणि गैरव्यवस्थापन याबाबत कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी समाज माध्यमावर पोस्ट लिहून केंद्रीय निवडणूक आयोगावर केलेले आरोप आयोगाने  फेटाळले आहेत. याबाबत आयोगाने खरगे यांना  लिहलेल्या पत्रात म्हंटल आहे की त्यांचे आरोप सर्वथा तथ्यहीन, पक्षपाती आणि समाजात भ्रम पसरवणारे आहेत. एखाद्या राष्ट्रीय पक्षाने निवडणूक प्रक्रिये संदर्भात अशा प्रकारचे आरोप करण हे गैर जबाबदारपणाच्या वृत्तीच दर्शन असून, यामुळे देशाच्या निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता धोक्यात येऊ शकते. यामुळे मतदारांच्या मानसिकतेवरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे खरगे यांनी यापुढे समाज माध्यमावर मत व्यक्त करताना काळजी घ्यावी असा सल्ला ही निवडणूक आयोगाने पत्रातून दिला आहे.

**<u>केजरीवाल</u>**

सर्वोच्च न्यायालयाने काल दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्यधोरण प्रकरणी 1 जून पर्यंत हंगामी जामीन मंजूर केला, त्यामुळे काल तिहार तुरुंगातून त्यांची सुटका झाली. सध्या सुरू कसलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पुढच्या टप्प्यात प्रचार करण्यासाठी त्यांना हा हंगामी जमीन मंजूर झाला आहे, मात्र 1 जूनला  दिल्लीतं मतदान झाल्यानंतर 2 जून रोजी त्यांना न्यायालयासमोर हजर रहाव लागेल. सर्वोच्च न्यायालयाने मात्र केजरीवाल यांना मद्यधोरण घोटळा प्रकरणी अटक करण्यात उशीर केल्याबद्दल सक्तवसुली संचालनालयावर ताशेरे ओढले आहेत. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दिपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने याबाबत टिप्पणी करताना सांगितल की मद्यधोरण घोटळा प्रकरणी केजरीवाल यांच्यावर सक्त वसुली संचालनालयाने ऑगस्ट 2022 मध्ये माहिती अहवाल दाखल केला होता, मात्र त्यांना यावर्षी 21 मार्च रोजी उशीराने अटक करण्यात आली

**<u>डीआरडीओ</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था DRDO च्या आठव्या तंत्रज्ञान परिषदेची बैठक काल नवी दिल्ली इथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, पोलीस आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलांमध्ये DRDO च्या तंत्रज्ञानाचा समावेश करण्याविषयीचा आढावा घेण्यात आला. देशभरातील विविध डीआरडीओ प्रयोगशाळा बैठकीत दूरस्थ पद्धतीनं सहभागी झाल्या होत्या. शस्त्रास्त्र प्रणाली, दळणवळण, अंतर्गत सुरक्षा, VIP सुरक्षा यासह नवनव्या तंत्रज्ञानाचं प्रदर्शन करणाऱ्या विविध DRDO ने विकसित केलेल्या उत्पादनांचं प्रदर्शनही यावेळी आयोजित करण्यात आलं होतं.

**<u>तेल</u>**

2023-24 या आर्थिक वर्षात देशातल्या तेल विपणन कंपन्यांचा एकत्रित नफा 86 हजार कोटी रुपये झाला असून गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत तो 25 पटीनं  जास्त आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने मागील वर्षी 6 हजार 980 कोटी रुपयांच्या तोट्याच्या तुलनेत यंदा 16 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त विक्रमी असा निव्वळ नफा नोंदवला आहे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचा गेल्या आर्थिक वर्षात कर वजा करून झालेला नफा 26 हजार 673 कोटी रुपयांचा असून तो मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत जवळपास 13 पटीने जास्त आहे. तर, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने 23-24 या वर्षात विक्रीचं प्रमाण आणि निव्वळ नफ्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये तेल विपणन कंपन्यांचा एकत्रित निव्वळ नफा 2013-14 या आर्थिक वर्षाच्या तुलनेत 543 टक्क्यांनी वाढला असल्याचं मंत्रालयानं  म्हटलं  आहे.

**<u>कुवैत-संसद</u>**

कुवेतचे अमीर शेख मेशल अल अहमद अल सबाह यांनी काल राजकीय गोंधळाचं कारण देत संसद बरखास्त करण्याची आणि संविधानाचे काही भाग चार वर्षांपर्यंत निलंबित करण्याची घोषणा केली. एका दूरचित्रवाणी वाहिनीवरुन बोलतांना, अलीकडील उलथापालथींमुळे  देशाच्या हिताचं रक्षण करण्यासाठी असं करणं भाग पडल्याचं अमीर यांनी म्हटलं आहे. गेल्या महिन्यात, या आखाती देशानं चौथ्या निवडणुका घेतल्या, त्यात मागील संसदेतील 46 पैकी 39 सदस्यांनी त्यांच्या जागा कायम ठेवल्या. घटनात्मक निलंबनाच्या काळात लोकशाही प्रक्रियेच्या सर्व पैलूंची कसून तपासणी केली जाईल असं त्यांनी घोषित केलं.

कुवेतच्या घटनेनुसार, निवडणुकीच्या दोन आठवड्यांच्या आत नवीन सरकार स्थापन करणं आवश्यक आहे. परंतु निवडून आलेली संसद आणि नियुक्त पंतप्रधान यांच्यातील तणावामुळे 4 एप्रिलच्या निवडणुकीपासून सरकार स्थापनेत अडथळा आला आहे.

**मोबाईल-सायबर**

सायबर गुन्ह्यांमध्ये गैरवापर झालेल्या संपूर्ण देशभरातील 28 हजार 200 मोबाईल हॅंडसेट ब्लॉक करण्याचे निर्देश दूरसंचार सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना दूरसंचार विभागानं दिले आहेत. तसंच 20 लाख मोबाईल क्रमांकांची पुन्हा तातडीनं पडताळणी करून अशी पुनर्पडताळणी पूर्ण न झाल्यास त्यांच्या सेवा खंडित करण्याचे निर्देशही दिले आहेत. गृह मंत्रालय आणि राज्य पोलिसांनी केलेल्या विश्लेषणात या मोबाईल हॅंडसेटचा सायबर गुन्ह्यांमध्ये गैरवापर झाल्याचं आढळून आलं आहे. या मोबाइल हॅंडसेट्सवर तब्बल 20 लाख वेगवेगळे मोबाइल क्रमांक वापरले गेल्याची धक्कादायक माहिती दूरसंचार विभागाने केलेल्या विश्लेषणात पुढे आली आहे. दूरसंचार विभाग, गृह मंत्रालय आणि राज्य पोलिसांच्या संयुक्त प्रयत्नांमधून अशी फसवणूक करणाऱ्यांचं जाळं उद्ध्वस्त करून नागरिकांचं डिजिटल धोक्यांपासून संरक्षण केलं जाईल असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**दाभोलकर निकाल**

अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्याध्यक्ष दिवंगत डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्ये प्रकरणी विशेष न्यायालयाने काल 11 वर्षांनी निकाल जाहीर केला. या प्रकरणातील आरोपी वीरेंद्रसिंह तावडें, विक्रम भावे आणि संजीव पुनाळेकर यांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. तर सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना जन्मठेपेची शिक्षा आणि 5 लाख रुपयांचा दंड ठोठवण्यात आला आहे. विशेष न्यायाधीश पी.पी.जाधव यांनी काल हा निर्णय दिला. डॉक्टर दाभोलकर यांची 20 ऑगस्ट 2013 रोजी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिराजवळील पुलावर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या आदेशावरून जून 2014 मध्ये या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला होता. दरम्यान दोषी असलेल्या दोघांना शिक्षा देण्याच्या निर्णयाचं दाभोलकर कुटुंबियांनी स्वागत केलं आहे. मात्र पुराव्याअभावी मुक्तता केलेल्यांना शिक्षा व्हावी यासाठी उच्च न्यायालयात जाणार असल्याचं मुक्ता दाभोळकर यांनी म्हटलं आहे. दाभोळकर कुटुंबीयांना शासन सर्व मदत करेल, शासन त्यांच्या सोबत आहे, अशी प्रतिक्रिया या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तर या निकालाचं सनातन संस्था स्वागत करत असल्याचं संस्थेचे अभय वर्तक यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितलं.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं ठाणे जिल्ह्यात उद्यापासून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवला असून तिथे पिवळा बावटा जारी केला आहे. रायगडसाठी आज आणि उद्या वादळाचा बावटा जारी केला आहे. या दरम्यान मुंबईत विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस पडेल. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात दोन भिन्न प्रकारच्या वाऱ्यांमुळे पाऊस पडत आहे. देशाच्या मध्य, पूर्व आणि दक्षिण भागांमध्ये परवा सोमवारपर्यंत विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता आहे. उद्यापर्यंत पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये ताशी 40 ते 50 किलोमीटर वेगाने वादळाची आणि तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे; बिहार आणि झारखंडमध्येही तुरळक ठिकाणी विजा आणि वादळी पावसाची शक्यता आहे. ओडिशा मध्ये उद्यापर्यंत आणि पश्चिम बंगालमध्ये गंगेच्या क्षेत्रात आज मुसळधार पावसाचा अंदाज आहे. सोमवारपर्यंत मध्य प्रदेश आणि विदर्भात गारपिटीची शक्यता असून उद्यापर्यंत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही गारपीट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, काल रात्री उशिरा राजधानी दिल्ली आणि परिसरात धुळीचं प्रचंड वादळ आलं. ताशी 50 किलोमीटर वेगाने वारे वाहत होते त्यामुळे अनेक झाडं आणि मोठ्या फांद्या पडून वाहतुकीवर परिणाम झाला. खराब हवामानामुळे अनेक विमान उड्डाणं अन्यत्र वळवण्यात आली. या आठवड्यात दिल्लीत हंगामातील सर्वाधिक 42 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. दरम्यान वादळाच्या परिस्थितीत लोकांनी घरामध्येच थांबावं आणि अनावश्यक प्रवास टाळावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.